प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO
WE MAKE CITIES
सिडको
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

दि. 21 जून 2018

# आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील प्रकल्पबाधितांना 12.5% योजनेअंतर्गत भूखंड वाटपाच्या आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी आयोजित शिबिरास सुरूवात

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळबाधित भूधारकांकरिता सिडको महामंडळाच्या वतीने 12.5 टक्के योजने अंतर्गत भूखंड इरादित करण्यात आले असून भूखंडाची वाटपाची प्रक्रिया कागदपत्रांअभावी प्रलंबित आहे, अशा भूधारकांकरिता 20 जून ते 2 जुलै या कालावधीत शिबीराचे आयोजन करण्यात आले असून, उलवे येथे या शिबीराची सुरुवात झाली आहे.

सिडकोच्या भूमी व भूमापन विभागातर्फे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बाधित भूधारकांना भूखंड इरादित करण्यात आले असून, कागदपत्रांअभावी भूखंडाचे वाटप पूर्ण न झाल्यामुळे, 20 जून ते 2 जुलै या कालावधीत शिबीराचे आयोजन केले आहे. सदर शिबीरास उलवा येथे दिनांक 20 जून, 2018 रोजी प्रारंभ झाला असून, त्याप्रमाणे तरघर येथे 22 जून, कोपरयेथे 25 जून, वडघर येथे 27 जून, दापोली येथे 29 जून आणि वहाळ येथे 2 आणि 3 जुलै रोजी असणार आहे. सदरहू गावनिहाय संचिकेमध्ये आवश्यक असलेल्या कागदपत्रांची माहिती स्थानिक ग्रामपंचायतीच्या कार्यालयात ठेवण्यात आली आहे. सिडकोच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांशी प्रत्यक्ष संपर्क साधून संचिकानिहाय आवश्यक कागदपत्रांची माहिती जाणून घेऊन त्याची पूर्तता करण्याकरिता या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, त्याचा लाभ घेण्याबाबत सिडको महामंडळाच्या वतीने भूधारकांना आवाहन करण्यात येत आहे.

---

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिध्दी देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**